# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/07/2023 (सोमवार) दुपार

## विनयभंग

पो.स्टे. मौदा :— दिनांक २१/०७/२०२३ चे १०.०० वा. ते दिनांक २२/०७/२०२३ चे १२.१२ वा. दरम्यान फिर्यादी वय १५ वर्ष हि दिनांक २१/०७/२०२३ ला घरून शाळेत जाण्याकरिता निघाली असता शाळेत जाणे करिता उशीर झाल्याने फिर्यादी सोबत असणाऱ्या मैत्रीणी निघुन गेल्या होत्या. त्यावेळी फिर्यादीच्या गावातील **आरोपी नामे— रनविर अंगराज ठाकरे** हा फिर्यादी जवळ मोटरसायकलने आला व फिर्यादीला म्हणाला की, माझा गाडीवर बस मी बोरगाव फाटया जवळ सोडून देतो, असे म्हणुन तो मी पंट्रोलपंप येथे जात आहे, मी तुला खरबीला सोडून देतो असे म्हणुन, फिर्यादीने गाडी थांब थांब म्हणता त्याने गाडी न थांबवता त्याने म्हटले की तु गाडीवर बसुन रहा नाहीतर तुला मारून टाकीन असे म्हटल्यावर फिर्यादी घाबरली व चुपचाप बसुन राहली व त्याने मोटरसायकल निहरवाणी गावाकडे असलेली बाल्याची वाडी पहाडीकडे घेवुन गेला व येथे शेतात काम करणाऱ्या बाया असल्याने त्याने गाडी पलटवुन जवाहर नगरकडे वळविले व तेथे त्याचा मित्र **आरोपी नामे— २) अमित गांवडे दोन्ही रा. चिचोली ता. मौदा जि. नागपुर** यास फोन करून बोलवले व हे दोघेही मिळुन नांदोरा झिरी येथील मंदीराकडे घेवुन गेले व त्याचा मित्र हा गाडी जवळ थांबला व रनविर अंगराज ठाकरे झाडा झुडपात फिर्यादीचा हात पकडून घेवुन गेला व फिर्यादी सोबत जबरदस्ती करू लागला तेव्हा फिर्यादीने त्याला ४ ते ५ थापड मारून जोर जोरात रडत होती जर तु कोणालाही सांगितले तर तुला मारून टाकीन अशी धमकी देत होता.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (अ), ३६३, ५०६, ३४ भादवि सहकलम ८, १२ बाल अत्याचार अधि. २०१२ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक निशा भुते पोस्टे मौदा मो. नं. ९९२२५६६१८० या करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कोंढाळी :— दिनांक २२/०७/२०२३ चे ११.०० वा. दरम्यान पो.स्टे. कोंढाळी हद्दीत यातील फिर्यादी यांची भाची वय १५ वर्ष ही फिर्यादी यांचेकडे दोन महिन्यापासुन राहत असुन दि. २२/०७/२०२३ रोजी ११/०० वा. दरम्यान फिर्यादीची भाची ही आईला भेटायला जात आहे असे सांगुन घरातुन निघुन गेलेली आहे. अदयाप पावेतो तिचा शोध लागलेला नाही, कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुरजुसे हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. कुही** :— अंतर्गत २५ कि.मी. अंतरावरील मौजा उमरेड ते नागपुर हायवे रोड क्र. ३५३ येथे दिनांक २२/०७/२०२३ चे ०८/३० वा. दरम्यान फिर्यादीची आई ही दिनांक २२.०७.२०२३ रोजी ११.०० वा. सुमारास कोणालाही न सांगता घरून निघुन गेली शोध घेतला असता मिळुन आली नाही. फिर्यादीची आई **मृतक नामे— सौ. सयाबाई बुलकुंदे** ही उमरेड ते नागपुर हायवे रोड क्र. ३५३ वर ०८.३० वा. दरम्यान पायदळ जात असता कोणतेतरी अज्ञात वाहनाने धडक मारून जखमी होवुन ती मरण पावली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रोहित हरिदास बुलकुदे, वय २९ वर्ष, रा. नारायण सिटी चिचघरे लेआउट, ता. उमरेड, ह. मु. बाबुराव वासनिक विजय विहार कॉलनी प्लाट नं ०६ नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (ए) भादंवी १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक हरिहर सोनकुसरे मो. नं. ९०२१५४२९१८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर